FORM-1A N.C.R.B. I.I.F.-I

पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154173

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि. मुंबई पहिली खबर क्र. FIR No. 15 वर्ष Year 2021 दिनांक Date 19/03/2021

2. (i) अधिनियम Act ........ कलमे Sections ........
(ii) अधिनियम Act ला.प्र. अधि. – 1988 कलमे Sections कलम 7
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day गुरुवार तारीख पासून Date from 18/03/2021 वेळ Time ........ तारीख पर्यंत Date to 19/03/2021 वेळ Time ........
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion)
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 16/03/2021 वेळ Time 15:00 वा. चे सुमारास
(c) गुन्हा दाखल झालेल्या सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 04/21 तारीख Date 19/03/2021 वेळ Time 05:20

4. माहितीचा प्रकार Type of Information ........ समक्ष लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ........ चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O.P. Name and No. ........
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name मनपा कार्यालय ठिकाणाचे नंबर No. if any ........ गल्ली Ward कुल वॉर्ड रस्त्याचे नाव Name of road स. गो. बर्वे मार्ग
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........ गाव Village ........ पोस्ट Post ........ तालुका Taluka कुर्ला जिल्हा Dist. मुंबई राज्य State महाराष्ट्र
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name फैजान अहमद (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name रिझवान खान
(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 26/01/1976 (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9820019103
(e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation ........
(g) धर्म Religion इस्लाम जात Caste मुस्लिम जनजात Sub-Caste ........
(h) पत्ता Address ........ गल्ली / सर्व्हे नं. Ward ........ घर / नाव नं. House/Name No. 01 फोन / मो. नं. Phone/Mo. No. ........ पॅन नं. PAN No. ........ गटर्स नं. Card No. ........
रस्त्याचे नाव Road पाईप रोड जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place इम्तियाज बिल्डींग गाव Village ........ पोस्ट Post कुर्ला (प) पो. स्टे Stn कुर्ला पो. ठाणे
तालुका Taluka कुर्ला जिल्हा Dist. मुंबई राज्य State महाराष्ट्र सध्याचा पत्ता Present Address वरीलप्रमाणे

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

1) आलोसे अमोल अरविंद लोखंडे, धंदा- नोकरी (कामगार) 2) आलोसे मदन हरीभाऊ नावरले (कामगार) 3) आलोसे अविनाश प्रकाश रंगुळकर (कनिष्ठ अभियंता) सर्व नेमणूक बृहन्मुंबई महानगरपालिका कुर्ला वार्ड, कुर्ला (प) मुंबई – 70

Y.P.P.-800 Reg.-(25×64-150 L.s.)-2-2018-PA3-(K) 829

दि. १९/०३/२०२१

यातील फिर्यादीनामे श्री. फैजल अहमद रिझवान खान, वय ४५ वर्षे, यांचा स्वतंत्र पानावर संगणकावर टंकलिखित केलेला जबाब हाच प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(सुप्रिया किरणनटे)
पोलीस निरीक्षक
ला. प्र. वि. मुंबई.

– फिर्याद– दिनांक – १८/०३/२०२१

श्री. फैजान अहमद रिझवान खान, वय ४५, धंदा –व्यवसाय (प्लॉटींग), रा.ठि.– रूम क्रमांक ०१, इम्तियाज बिल्डींग, पाईप रोड, कुर्ला (पश्चिम), मुंबई – ४०००७० मो.क्र. ९८२००१९१०३, ९७०२४५४८७०, आधार कार्ड नं– ८४३२५७४८८४३४

––oo––

मी वरील प्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर माझ्या कुंटुबासोबत जन्मापासुन राहत आहे. मी जमिन प्लॉटींगचा व्यवसाय करीत असून, सदर व्यवसायातील उत्पन्नातून माझे कुटूंबाचा उदरनिर्वाह करतो.

आमचे कुटूंबामध्ये मी सर्वात मोठा भाऊ असुन, कुटूंबातील महत्वाचे निर्णय माझ्या सल्ल्याने घेतले जातात. माझे काका परवेज अब्दुल हई खान यांचे दिड वर्षापूर्वी निधन झाले असुन, त्यांचे नावे असलेले घर रूम नं. १४, चाळ क्र. २ बी/ब्लॉक, राम बच्चन तबेला, विनोबा भावे नगर, कुर्ला, पश्चिम, मुंबई – ७० हे गेले चार वर्षापासून भाडेतत्वावर देत होते. नमुदचे घर जुने असुन त्याची दुरूस्ती करणे आवश्यक असल्याने, माझे काका परवेज यांचा मुलगा नामे वाहिद परवेज खान यांनी मला नमुद घराच्या दुरूस्ती करायची असल्याबाबत सांगितले. त्यामुळे मी नमुद घराची दुरूस्ती करण्याची परवानगी मिळविणे करीता दहा दिवसांपूर्वी बृहन्मुंबई महानगर पालीका, एल/विभाग कुर्ला, मुंबई – ४०००७० इमारत/ कारखाने विभाग येथे गेलो होतो. त्यावेळी तेथे कार्यरत असलेले लोकसेवक श्री मदन यांची भेट घेवुन, माझे घर मला दुरूस्त करायचे असुन त्याकरीता मला काय करावे लागेल अशी विचारणा केली. त्यावेळी श्री मदन साहेबांनी मला त्यांचा मोबाईल क्रमांक ८९२८९७५४२८ हा देवुन त्यांना कॉल करण्यास सांगितले.

त्यानंतर दिनांक १२/०३/२०२१ रोजी मी माझा मोबाईल क्रमांक ९७०२४५४८७० या वरून श्री मदन साहेब यांच्या वर नमुद मोबाईल क्रमांकावर संपर्क केला असता त्यांनी माझ्या कडे दुरूस्ती करण्याच्या घराचा पत्ता विचारून ते साईटवर व्हिजीट करण्याकरीता येतील असे मला सांगितले. त्यानुसार मी त्यांना पत्ता सांगितला असता ते त्याच दिवशी साधारण दुपारी ०३:०० वाजण्याच्या सुमारास वर नमुद रूम नं. १४, चाळ क्र. २ बी/ब्लॉक, राम बच्चन तबेला, विनोबा भावे नगर, कुर्ला, पश्चिम मु. ७० या ठिकाणी आले. त्यावेळी त्यांनी त्यांच्याकडील मोबाईलद्वारे घराचे फोटो काढले व मला बृहन्मुंबई महानगर पालीका एल/विभाग, पहिला मजला येथे येवुन भेटण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी त्याच दिवशी संध्याकाळी ०४.३० वाजताचे सुमारास त्यांना त्यांचे कार्यालयात जावुन भेटलो. त्यावेळी मी श्री मदन साहेबांना अजुन काही अर्ज करावे लागेल किंवा कसे? याबाबत विचारणा केली असता त्यांनी मला अर्ज वगैरे काही करू नका, घर दुरूस्तीचे काम तीन दिवसात पूर्ण करा असे सांगुन ''**जो चलता है वो दे दो**'' असे मला सांगितले. त्यावेळी मी त्यांना ''**क्या चलता है**'' अशी विचारणा केली असता त्यांनी '' **एक रूम का पंधरा हजार** '' असे मला सांगितले. त्यानंतर मी तेथुन घरी निघुन गेलो.

त्यानंतर दिनांक १६/०३/२०२१ रोजी पुन्हा मी श्री मदन साहेब यांना फोन करून, त्यांचे सांगणेनुसार त्यांचे वर नमुद कार्यालयात त्यांची भेट घेण्याकरीता गेलो. त्यावेळी श्री मदन साहेब हे मला श्री. अविनाश साहेब, कनिष्ठ अभियंता यांच्या केबिन मध्ये घेवुन गेले व श्री मदन साहेब यांनी श्री अविनाश साहेब यांच्या कानात काहीतरी कुजबूज केली. त्यानंतर श्री अविनाश साहेब यांनी त्यावेळी माझ्याकडे 'मदन यांनी तुम्हाला काही सांगितले नाही का?' अशी विचारणा केली. त्यावेळी मी काय झाले साहेब असे श्री अविनाश साहेब यांना विचारले असता त्यांनी '' पंधरा हजार रूपया देदो और तीन दिन मे अपना काम खतम कर लो '' असे सांगितले. त्यावेळी मी श्री अविनाश साहेबांना पंधरा हजार रूपये जादा होता है असे सांगितले. त्यानंतर श्री अविनाश यांनी बाहेर कोणालाही विचारा हाच भाव

चालु आहे असे सांगुन, दिनांक १८/०३/२०२१ रोजी मला पुन्हा भेटण्यास बोलावले. त्यानंतर मी तेथुन निघुन गेलो.

मला बृहन्मुंबई महानगर पालिका, एल विभाग, कुर्ला पश्चिम, मुंबई ७० या कार्यालयातील श्री मदन व श्री अविनाश साहेब यांना लाच देण्याची इच्छा नसल्यामुळे दिनांक १६/०३/२०२१ रोजी सायकांळी ०४.०० वा. चे सुमारास मी माझी पत्नी नामे रेहाना फैजान खान, वय ४४ वर्षे हीचेसह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे येवून तेथील वरिष्ठांना भेटलो. त्यांनी मला सहाय्यक पोलीस आयुक्त श्रीमती वैशाली गोरडे व पोलीस निरीक्षक श्रीमती सुप्रिया नटे यांची भेट घालून दिली. त्यांनी मला घडल्या हकीकती बाबत विचारणा करून, मला माझा तक्रार अर्ज लेखी देण्यास सांगितले. मला हिंदी व्यवस्थित लिहीता येत नसल्याने माझी पत्नी श्रीमती रेहाना हीच्या हस्ताक्षरात अर्ज लिहून दिला व दिनांक १८/०३/२०२१ रोजी मला श्री मदन व श्री अविनाश साहेब यांनी दुपारच्या वेळेत त्यांच्या कार्यालयात येवुन भेटण्यास सांगितले आहे, असे सपोआ श्रीमती वैशाली गोरडे व पो.नि. श्रीमती सुप्रिया नटे यांना सांगितले. त्याप्रमाणे मला पोनि सुप्रिया नटे यांनी दिनांक १८/०३/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता अॅन्टी करप्शन ब्युरो, वरळी येथे बोलावीले. त्यानंतर मी माझे घरी निघुन गेलो.

पो.नि. श्रीमती सुप्रिया नटे यांनी सांगितल्या प्रमाणे मी आज दिनांक १८/०३/२०२१ रोजी सकाळी ११:०० वाजणेच्या सुमारास अॅन्टी करप्शन ब्युरो, वरळी, मुंबई येथे येवुन पो.नि. श्रीमती सुप्रिया नटे यांच्या कक्षात हजर राहीलो. सदर वेळी सपोआ गोरडे मॅडम व दोन पंच अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात हजर होते. त्यावेळी पो.नि. श्रीमती सुप्रिया नटे यांनी मी केलेल्या तक्रारीची दोन शासकीय पंचासमक्ष बृहन्मुंबई महानगर पालीका, एल/विभाग, कुर्ला पश्चिम, मुंबई येथे पडताळणी करण्यात येणार आहे असे सांगुन तेथे उपस्थित दोन पंचांची ओळख करुन दिली. पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून, होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले.

नमुद वेळी मी माझे तक्रारी बाबत पंचाना माहिती दिली. पोनि श्रीमती सुप्रिया नटे यांनी माझा तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पंचानी वाचून त्यावर स्वाक्षऱ्या केल्या व त्यानंतर पोनि श्रीमती सुप्रिया नटे यांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पोनि श्रीमती सुप्रिया नटे यांनी माझी पडताळणी पथकाशी ओळख करून दिली. त्यावेळी मी पोनि. श्रीमती सुप्रिया नटे यांना माझी स्वत:ची बर्ग मॅन मोटर सायकल क्र. एम.एच.०५ के.जे ३९४४ सोबत घेतो अशी विनंती केली असता त्यांनी संमती दिली. त्यानंतर मी व पोलीस अंमलदार श्री सोरटे हे माझे मोटर सायकल वर बसलो व उर्वरीत सापळा पथक पोलीस वाहनामध्ये बसले. त्यानंतर पोलीस पथक व आम्ही ला.प्र.वि. कार्यालयातून निघून टाटा कम्युनीकेशन ऐव्हेन्यु ३, बि.के.सी. बांद्रा पुर्व, मुंबई येथे आलो.

त्यानंतर मी पोनि श्रीमती सुप्रिया नटे या असलेल्या पोलीस वाहनामध्ये येवुन बसलो. त्यावेळी पोनि श्रीमती सुप्रिया नटे यांनी पोलीस अंमलदार सोरटे यांच्या मदतीने डिजीटल रेकॉर्डर चालू करून, माझे कुर्त्याचे आतील बनियनला लावले व त्यानंतर बृहन्मुंबई महानगर पालीका एल/विभाग, पहिला

समक्ष,

( सुप्रिया नटे )
पोलीस निरीक्षक ,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई

मजला, कुर्ला पश्चिम, मुंबई येथील श्री मदन व श्री अविनाश यांचे कार्यालयात पडताळणी करीता पंच फारूख शेख यांचे सह माझे वर नमुद मोटर सायकलवरून पाठविले. सदर ठिकाणी गेल्या नंतर लोकसेवक श्री मदन यांची भेट झाली. त्यावेळी मी त्यांना " **कल जुम्मा है काम शुरू करना है**" म्हणुन लोकसेवक श्री अविनाश साहेबांशी भेट घालुन देण्यास सांगितले. त्यानंतर मदन साहेब मला अविनाश साहेबांच्या केबिन मध्ये घेवुन गेले. त्यावेळी मदन यांनी अविनाश साहेबांना मला माझे घराची उंची वाढवायची असल्या बाबत सांगितले. त्यावेळी श्री अविनाश साहेब यांनी श्री मदन यांस सांगितले की, " **ठिक आहे, तेवढे सांग त्याला काही कमी जास्त नाय करायच, सबके लीये सेम है.**" असे बोलुन "**पंधरा देदो**" असे मला सांगितले. त्यावेळी मी '**पंधरा हजार क्या**' असे श्री अविनाश साहेब यांना विचारणा केली. त्यावेळी त्यानी हो बोलुन संमती दर्शवली. त्यानंतर मी त्यांचे कडे पैसे कमी करण्याबाबत विनंती केली असता श्री अविनाश साहेब यांनी "**चौदा**" असे सांगितले असता मी "**चौदा हजार क्या?**" अशी विचारणा केली. त्यावेळी श्री अविनाश साहेबांनी **हो** म्हणून संमती दर्शवली. त्यानंतर सदरची रक्कम मी घरातुन आणुन देतो असे सांगुन, त्या ठिकाणा वरून निघुन टाटा कम्युनीकेशन ऐव्हेन्यु ३, बि.के.सी. बांद्रा मुंबई येथे उभ्या असलेल्या पोलीस वाहनाजवळ परत आलो.

पोनि सुप्रिया नटे यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण पंचासमक्ष ऐकले. लोकसेवक मदन व लोकसेवक श्री अविनाश याने पडताळणी दरम्यान लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने व लोकसेवक यांनी लाचेची रक्कम तात्काळ मागणी केली असल्याने त्वरीत सापळा कारवाई करावयाची आहे असे पोनि सुप्रिया नटे यांनी सांगितले. त्याप्रमाणे मला सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत त्यांनी सुचना दिल्या. त्यानंतर माझे कडुन माझे घरखर्चाच्या बचतीमधून आणलेली लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रू. १४,०००/- (रू. ५००/- दराच्या २८ भारतीय चलनी नोटा) स्वतःचे ताब्यात घेतली. सदर नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन अँथ्रासीन पावडरचे गुणधर्म मला पंचांसमक्ष समजावुन सांगितले. पोनि सुप्रिया नटे यांनी लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मला माझ्या डोळयावर लावलेला चष्मा खाली काढून कुर्त्याच्या उजव्या खिशा मध्ये ठेवण्याचा पुर्वनियोजीत इशारा करावा असे सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले.

त्यानंतर पोलीस वाहनात पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेस अँथ्रासीन पावडर लावली व माझे शर्टाचे आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून, पुन्हा पंच फारूख शेख यांचेसह सापळा कारवाईकरीता लोकसेवक यांचे बृहन्मुंबई महानगर पालीका एल/विभाग, पहिला मजला, कुर्ला पश्चिम, मुंबई येथे पाठविले. माझे पाठोपाठ पोलीस पथक काही अंतर ठेवून होते. मी लोकसेवक श्री मदन यांच्या केबीनजवळ गेलो असता ते मला त्यांचे केबिन मध्ये भेटले. त्यावेळी मी लोकसेवक श्री मदन यांना माझ्या कुर्त्याच्या वरील डाव्या खिशा मध्ये ठेवलेले पैसे काढुन देत असतानाच श्री मदन यांनी त्यांच्या हाताने मला थांबण्याचा इशारा केला व अमोल नावाच्या इसमास आवाज दिला. त्यावेळी डार्क चॉकलेटी रंगाचा शर्ट व आकाशी रंगाची जिन्स घातलेला नमुद अमोल नावाचा इसम आमच्या समोर आला. त्यानंतर लोकसेवक श्री मदन यांनी हाताच्या खुणेने सदर इसमाच्या हातात पैसे देण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी माझे कडील अँथ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम रू. १४,०००/- (रू. ५००

वेळी लोकसेवक श्री मदन यांच्या सांगणे वरून, वर नमुद इसम नामे श्री अमोल याने लाचेची रक्कम घेतल्यानंतर मी सापळा पथकास दिसेल अशा रीतीने माझ्या डोळयावर लावलेला चष्मा खाली काढून कुर्त्याच्या उजव्या खिशा मध्ये ठेवुन सापळा पथकास पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी पोलीस पथकाने तात्काळ लोकसेवक अमोल यांस रू. १४,०००/– लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले. त्यानंतर पाठोपाठ लोकसेवक श्री मदन व श्री अविनाश यांना देखील लाचेची मागणी केली व ती लोकसेवक श्री अमोल यांच्या मार्फतीने स्विकारली म्हणुन सापळा पथकाने ताब्यात घेतले. नमुद वेळी पोनि श्रीमती सुप्रिया नटे यांनी पंचांसमक्ष वर नमुद तिनही लोकसेवक यांना त्यांचे पुर्ण नाव व पदा बाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांची नावे अनुक्रमे १) श्री अमोल अरविंद लोखंडे (कामगार) २) श्री. मदन हरीभाऊ नौबत (कामगार), ३) श्री. अविनाश प्रकाश इंगुळकर, (कनिष्ठ अभियंता) असे सांगितले.

माझे मयत काका परवेज अब्दुल हई खान यांच्या मालकीचे घर रूम नं. १४, चाळ क्र. २ बी/ब्लॉक, राम बच्चन तबेला, विनोबा भावे नगर, कुर्ला, पश्चिम मु. ७० याची दुरूस्ती करण्याची परवानगी मागणे करीता मी बृहन्मुंबई महानगर पालीका एल/विभाग, पहिला मजला, कुर्ला पश्चिम मुंबई येथे गेलो असता तेथील लोकसेवक श्री. मदन हरीभाऊ नौबत (कामगार), श्री. अविनाश प्रकाश इंगुळकर, (कनिष्ठ अभियंता) यांनी दि. १८/०३/२०२१ रोजी रू. १५,०००/– लाचेची मागणी करून, तडजोडीअंती रू. १४,०००/– लोकसेवक श्री अमोल अरविंद लोखंडे (कामगार) यांच्या मार्फतीने स्विकारले म्हणुन माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे. माझे लोकसेवक श्री मदन, श्री अविनाश व श्री अमोल यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून ती मला मराठीतुन वाचून, मराठी व हिंदी मधुन समजावुन सांगितली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

**( सुप्रिया नटे )**
पोलीस निरीक्षक ,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई

9. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे
Reasons for delay in reporting by the Complainant / Informant ............ निरंक

10. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना पत्रे जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page

(a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य
Total Value of properties stolen / involved ............ रुपये 15,000/-

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक
Unnatural / Accidental Death Case No., if any ............ —

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page

यातील बातमी नमूद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचे मयत काका नामे परवेझ अब्दुल हई खान यांच्या मालकीचे कुर्ला पश्चिम मधील घराची दुरुस्ती संदर्भात विचारणा करण्यास गेले असता बृहन्मुंबई म न पा मुख्य / वार्ड, पटिका मोजणी, एल (प) मुंबई येथील कॉलम क्रमांक 7 मधील आरोपी क्रमांक 02 व 03 यांनी दिनांक 18/03/2021 रोजी रुपये 15,000/- लाचेची मागणी करून तडजोडी अंती रु. 15,000/- लाचेची रक्कम आरोपी क्रमांक 01 यांच्या मार्फतीने स्विकारले म्हणून यांचेविरोधात कलम 7 भ्रष्टाचार प्रति. अधि. 1988 अन्वये गुन्हा नोंद

13. केलेली कार्यवाही - 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : सुप्रिया किरण नटे, पोलीस निरीक्षक

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ............

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ............, जिल्हा ............, राज्य ............

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)............ Rank............ No............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to............ (3) Transferred to P. S. ............ District............ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ............ सुप्रिया किरण नटे
पदनाम Rank............ पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ............ ला.प्र.वि. मुंबई.
Posting
Code No. of I. O. ............

15. 1. न्यायालयात सादर केल्याची तारीख............
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report